Motiwala Education And Welfare Trust's An ISO : 9001-2008 Certified Institute
MOTIWALA HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & HOSPITAL, And
F.G. MOTIWALA P.G. INSTITUTE OF HOMOEOPATHY & RESEARCH CENTRE
Postal Address : P. O. Box No. 106, G.P.O. Nashik - 422001
Tel. : +91 (253) 2351693, 2354819 Fax No. 0253 2369401
Email : mhmc1@hotmail.com website : www.mhmc.org.in
Founder :
Late Mrs. Z.F. Motiwala

क्र.एमएचएमसी/ससापत्रव्यवहार/४६६/२०२० दिनांक २९/०४/२०२०

प्रति,

मा.नामदार श्री. राजेशजी टोपे,
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुंटुब कल्याण
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

सन्माननीय १. मा. श्री हेमंतजी गोडसे, खासदार, नाशिक लोकसभा मतदार संघ, नाशिक
२. मा. सौ. भारतीताई पवार, खासदार, दिंडोरी लोकसभा मतदार संघ, नाशिक
३. मा. सौ. सीमाताई हिरे, आमदार नाशिक पश्चिम मतदार संघ नाशिक

यांचे बहुमुल्य मार्गदर्शन व वरिष्ठ प्राधिकरणांकडे योग्य ती शिफारस करणेच्या विनंतीसह विहित मार्गाने.

विषय — कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराने बाधित व विलगीकरण करण्यात आलेल्या रुग्णांसाठी होमिओपॅथी 'रोग प्रतिकार शक्तीवर्धक' औषधी वापराबाबत....

आदरणीय महोदय,

कोवीड १९ या संसर्गजन्य साथरोगाने अलिकडे अतिशय भयावह व उग्ररुप धारण केले असून त्याचा प्रकोप व प्रचार संपूर्ण देशामध्ये अतिशय वेगाने फैलावत आहे. या आजारावर आजमितीस कोणतीही खात्रीशीर उपचार पद्धती व औषधे उपलब्ध नसल्याने अशा बिकट प्रसंगी विविध आरोग्य विज्ञान विद्याशाखांनी पुढाकार घेउन त्या—त्या संबंधित शाखेतील आजपर्यंतच्या वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान व अनुभवाच्या आधारावर कोविड — १९ या आजाराने बाधित व विलगीकरण केलेल्या रुग्णांवर पर्यायी/पुरक औषधोपचार पध्दतीचा वापर करून अशा रुग्णांवर औषधोपचार करणेसाठी पुढाकार घेणे आजच्या बिकट परिस्थितीत अत्यावश्यक आहे.

काळाजी गरज लक्षात घेउन, केंद्रिय होमिओपॅथी संशोधन परिषद, नवी दिल्ली **(CCRH)** व आयुष मंत्रालय, भारत सरकार **(Ministry of AYUSH, Govt of India)** यांनी, या साथीचा उद्रेक झाल्यापासून म्हणजे डिसेंबर २०१९ पासूनच, यापुर्वी आलेल्या संसर्गजन्य साथीच्या आजारामध्ये वापरण्यात आलेली होमिओपॅथी औषधे व उपचार पध्दती आणि या शास्त्रातील



" Thy name is my healing, O my God..." Bahai Prayer

Founder : Late Mrs. Z.F. Motiwala
Postal Address : P. O. Box No. 106, G.P.O. Nashik - 422001
Tel. : +91 (253) 2351693, 2354819 Fax No. 0253 2369401
Email : mhmc1@hotmail.com website : www.mhmc.org.in

मुल्याधारीत सखोल अभ्यास विचारात घेउन, या आजारावर होमिओपॅथी औषधे घेण्याबाबत सुचविले आहे. त्यासाठी काही महत्वाचे दस्ताऐवज आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडत आहे.

या संदर्भात मी आपणास प्रकर्षाने नमूद करु इच्छितो की, या आजारामुळे विलगीकरण केलेल्या तसेच संशयित रूग्णांवर होमिओपॅथी या शास्त्राची विस्तीर्ण व्याप्ती व त्यांचे गुणात्मक परिणाम लक्षात घेउन अशा रूग्णांवर कोणतेही अतिरिक्त दुष्परिणाम/जोखीम विना होमिओपॅथी औषधे अत्यंत उपयुक्त व प्रभावी ठरतील यात शंका नाही.

या प्रस्तावाच्या समर्थनार्थ मी आपल्या माहिती व अवलोकनासाठी खालील दस्ताऐवज सादर करीत आहे.

१) आयुष मंत्रालय, भारत सरकार यांची दि. २१ एप्रिल २०२० ची अधिसूचना

२) आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, नवीदिल्ली, नॅशनल कॅपिटल टेरीटोरी यांच्या सल्लागार मंडळाने, केंद्रिय होमिओपॅथी अनुसंधान परिषद यांच्या वस्तुस्थिती दर्शक शिट वरून तयार केलेले दि. १९/०४/२०२० ची नोट

३ मा. सचिव आयुष मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. ०६/०३/२०२० रोजीचे पत्र

४ मणिपुर सरकारचे दि. ३०/०१/२०२० रोजीचे आदेश

५ आखिल भारतीय होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयांच्या संघटनेचे पत्र

६ न्युक्लिअर पॉवर कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांचे दि. २१/०३/२०२० रोजीचे परिपत्रक

७ मा. श्री. राधाकृष्ण गमे, आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना सादर केलेले दि. २४/०३/२०२० रोजीचे पत्र.

८ संचालक, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे दि. २४/०३/२०२० रोजीचे पत्र

९ मध्य रेल्वे च्या सल्लागार मडळाचे दि. २९/०३/२०२० रोजीचे पत्र.

महोदय, होमिओपॅथी शास्त्राचा अनुभव सिध्दांत अभ्यास व यापूर्वी साथीच्या रोगांवर होमिओपॅथीद्वारे करण्यात आलेली प्रभावी व यशस्वी औषध योजना यांचा पुर्वानुभव लक्षात घेउन केंद्रिय होमिओपॅथी संशोधन परिषदेने, मागील दोन शतकांपासून मुलभूत तत्वांवर आधारीत व काळांच्या कसोटीवर यशस्वी ठरलेली होमिओपॅथी उपचार पध्दती व सद्यस्थितीतील बिकट प्रसंग याचा विचार करुन होमिओपॅथी औषधे वितरीत करण्यबाबत सुचविले आहे. मी होमिओपॅथी शास्त्राचा उदगाता असून या शास्त्रावर माजी नितांत श्रध्दा व निष्ठा असून वैज्ञानिक सिध्दांताच्या कसोटीवर उतरलेल्या कार्यक्षम औषधोपचार पउपचार पध्दतीवर माझा ठाम विश्वास असल्याने, कोणतेही दुष्परिणाम नसलेली, जलद आणि प्रभावीपणे कार्य करू शकणारी औषधोपचार पध्दतीस

Motiwala Education And Welfare Trust's An ISO : 9001-2008 Certified Institute
MOTIWALA HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & HOSPITAL, And
F.G. MOTIWALA P.G. INSTITUTE OF HOMOEOPATHY & RESEARCH CENTRE
Founder : Late Mrs. Z.F. Motiwala
Postal Address : P. O. Box No. 106, G.P.O. Nashik - 422001
Tel. : +91 (253) 2351693, 2354819 Fax No. 0253 2369401
Email : mhmc1@hotmail.com website : www.mhmc.org.in

अनुसरून या दुर्धर अशा कोविड – १९ या आजारावर अत्यंत खात्रीशार व प्रभावी असलेले "अर्सेनिक अल्बम ३०" **(Arsenicum Album 30)** हे औषध दिवसातून फक्त एक वेळा सकाळी सलग तीन दिवसासांठी घेण्यात यावे व साथरोग नियंत्रणात आलेली नसल्यास एक महिन्यानंतर पुन्हा सदरच्या औषधाची पुनरावृत्ती करण्यात यावी. सदरचा शास्त्रीय कार्यक्रम केंद्रिय होमिओपॅथी संशोधन परिषदेच्या मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली पार पाडली जाईल.

हा संशोधनारीत प्रकल्प राबविण्यास शासनाने परवानगी दिल्यास, आमच्या महाविद्यालयाची ट्रस्ट या प्रकल्पावर येणारा जास्तीत जास्त खर्च सोसण्यास तयार आहे.

तरी, सदर प्रस्तावाचा विचार करुन शासनाने खालील प्राधिकरणांना योग्य ती शिफारस व निदेश दयावेत.

१. मा. जिल्हाधिकारी, नाशिक
२. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
३. मा. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक
४. मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, मालेगांव.
५. मा. आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव

कृपया आमच्या महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणा–या स्तुत्य उपक्रमाचा विचार व्हावा ही विनंती.

धन्यवाद !

मानवतेच्या सेवेत,
आपला नम्र,

(डॉ.एफ.एफ. मोतीवाला)

प्रत :–
१. मा. जिल्हाधिकारी, नाशिक
२. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
३. मा. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक
४. मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, मालेगांव.
५. मा. आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, नाशिक



" Thy name is my healing, O my God..." Bahai Prayer